# जिल्हा व सत्र न्यायालय, (न्यायमंदिर)नागपुर

## माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ४(१)(ब) मधील

## १७ बार्बीची माहिती

## जिल्हा व सत्र न्यायालय, नागपुर

## माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ४(१)(ब) बाबत

## माहिती

## विवरण

## संघटनेचे नाव : जिल्हा व सत्र न्यायालय, नागपुर

ही संघटना (कार्यालय) उच्च न्यायालय, मुंबई यांची सहायक संस्था आहे.

## संस्थेची कार्ये

संस्थेचे मुख्य दोन कार्य आहेत.

१.न्यायीक

२.प्रंबधकीय

## संस्थेची कर्तव्ये

१.नागपुर जिल्हयातील सर्व सहाय्यक न्यायालयाचे कार्यप्रणालीवर देखरेख ठेवणे.

२.सरकारकडुन मिळालेले अनुदान सर्व सहाय्यक अधिका-यांना वेळोवेळी वाटप करणे.

३.सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, विधी व न्याय विभाग आणि राज्य सरकार यांचेशी वेळोवेळी पत्रव्यवहार करणे.

४.वेगवेगळया कायदयानुसार न्याय निवाडा करणे.

५. नियमानुसार वर्ग ३ आणि वर्ग ४ सरकारी कर्मचा-यांची भरती करणे.

६. सेवा नियमानुसार कर्मचा-याना बढती प्रदान करणे.

७. प्रंबधकीय कार्ये कार्यप्रणाली नुसार सांभाळणे आणि सरकार व उच्च न्यायालयाने वेळोवेळी ठरवुन दिलेल्या नियमानुसार प्रंबधकीय कार्य हाताळणे.

८. प्रंबधकीय स्वरूपाची कार्य पार पाडणे जसे कर्मचा-यांच्या बदल्या करणे, कर्मचा-यांची विभागीय चौकशी करणे इत्यादी.

## संस्थेचे मुख्य अधिकारी

प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश हे या संस्थेचे (संघटनेचे) मुख्य अधिकारी आहेत. तसेच ते जिल्हा व विधी न्यायसेवा विभाग, नागपुर चे अध्यक्ष आहेत. त्यांचे मार्गदर्शनाखाली लोकन्यायालय, सेमिनार, जागरूकता कार्यक्रम तसेच विविध कायदेविषयक विषयांवर चर्चासत्र आयोजित करणे इत्यादी सर्व कार्य त्यांच्या मार्गदर्शनानुसार केली जातात.

उच्च न्यायालयाचे मार्गदर्शनाखाली कर्मचारी आणि न्यायीक अधिकारी यांची कार्यक्षमता वाढविण्याकरीता कार्यशाळा आयोजित केली जाते.

प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश हे सावकारी प्रतिबंधक कायदा २००२ नुसार विशेष न्यायाधीश म्हणुन काम पाहतात. प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश हे मोटार अपघात दावा न्यायाधीकरणाचे अध्यक्ष आहे. प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश यांना Wakf Act नुसार वाद हाताळणे, त्याचे प्रश्न सोडविणे तसेच Wakf property चे विवाद हाताळण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहे.

**<u>अधिकारी आणि कर्मचा-यांचे अधिकार आणि कर्तव्ये</u>**

**<u>न्यायीक अधिक-यांची वर्गवारी खालीलप्रमाणे आहेत.</u>**

१.जिल्हा न्यायाधीश आणि अतिरीक्त सत्र न्यायाधीश.

२.तदर्थ जिल्हा न्यायाधीश आणि अतिरीक्त सत्र न्यायाधीश.

वरील न्यायीक अधिकारी हे दिवाणी व फौजदारी दोन्ही प्रकारचे खटले चालवित असतात आणि अपील व फौजदारी (सत्र) खटले हे सत्र न्यायालय चालविते तसेच विशेष खटले सुध्दा सत्र न्यायालयात चालविले जातात.

अ) रूपये दहा लाखा पर्यंतचे दिवाणी खटले हे अपीलाकरीता जिल्हा न्यायालयात चालविले जातात व निकाली काढले जातात. काही जिल्हा न्यायाधीशांना मोक्का आणि टाडा कायदयार्तंगत सदर खटले चालविण्याचा अधिकार आहे.

ब) <u>मोटार अपघात दावा न्यायाधिकरण</u>

मोटार अपघातासंबधी चे दावे हे मोटार अपघात दावा न्यायाधिकरण मध्ये चालविले जातात.

क) <u>दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर</u>

पाच लाख रूपयापेक्षा जास्त किंमतीचे दावे चालविण्याचा अधिकार दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, यांना प्रदान करण्यात आला आहे.

सरकार संबधीत, विवाह संबधीत, जमीन अधिग्रहणा संबधीचे दावे या न्यायालयार्तंगत चालविले व निकाली काढली जातात.

ड) <u>न्यायाधीश लघुवाद न्यायालय</u>

वरील न्यायीक अधिका-यांना महाराष्ट्र रेंट कंट्रोल कायदा १९९९ संबधीत दावे चालविण्याचा अधिकार आहे.

इ) <u>मुख्य न्यायदंडाधिकारी</u>

सत्र न्यायालयात चालविले जाणा-या खटल्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचे फौजदारी खटले सदर न्यायालयात चालविले जातात.

ई) <u>दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर</u>

पाच लाख रूपयापर्यंत चे दिवाणी दावे चालविण्याचा अधिकार या न्यायालयास

आहे. म्युनिसिपल कार्पोरेशनच्या वाद-विवादा संबधीत दावे चालविण्याकरिता दोन विशेष कार्पोरेशन न्यायालयांची स्थापना केलेली आहे.

उ) **प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकरी**

सत्र न्यायालय, मुख्य न्यायदंडाधिकारी व विशेष न्यायालयात चालविल्या जाणा-या खटल्या व्यतिरिक्त इतर सर्व फौजदारी खटले या न्यायालयात चालविले जातात.

मोटार अपघात कायदयार्तंगत चालविल्या जाणा-या खटल्या साठी नागपुर जिल्हयात मोटार वाहन न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे.

रेल्वे संबधीत सर्व खटले चालविण्याकरीता रेल्वे पोलिस, नागपूर परिक्षेत्रासाठी विशेष रेल्वे कोर्टाची स्थापना करण्यात आली आहे.

ई) **बाल न्यायीक संस्था**

नागपुर जिल्हयाच्या न्यायीक अधिकाराखाली नागपुर येथे बाल गुन्हेगारी संबधातील कलम-४ अंतर्गत येणारे खटले चालविण्यासाठी बाल न्यायीक संस्था स्थापन करण्यात आली.

श्री. एन. एन. जोशी, १३ वे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालय क. ६ यांची बाल न्यायीक संस्थेवर मुख्य न्यायदंडाधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली असुन संबधीत खटले बुधवार आणि गुरूवार ला चालविले जातात.

विशेष रेल्वे न्यायालय, नागपुर चे न्यायीक अधिकार हे नागपूर ते बडनेरा, नागपूर ते बल्लारशाह आणि नागपुर ते गोंदिया पर्यंत आहे.

**कर्मचा-यांचे अधिकार आणि कर्तव्य**

कर्मचा-यांचे विविध वर्ग व संघटन खालील प्रमाणे आहेत.

**कर्मचारी वर्ग - २**

१.प्रबंधक

२.स्वीय सहाय्यक

**कर्मचारी वर्ग - ३**

१.लघुलेखक, उच्च श्रेणी

२.लघुलेखक, निम्म श्रेणी,

३.लघु टंकलेखक व कनिष्ठ लिपीक

४.अधिक्षक

५.सहाय्यक अधिक्षक

६.वरिष्ठ लिपीक / कनिष्ठ लिपीक

७.दुभाषी

८.हेड बेलीफ

९.बेलीफ

१०.वाहन चालक

**कर्मचारी वर्ग - ४**

१.झेरॉक्स ऑपरेटर

२.उद्वाहक

३.पुस्तक बांधणीकार

४.हवालदार / नाईक

५.चपराशी / पहारेकरी / वॉटरमन (उदकी)

६.सफाईगार

**७. कर्मचा-याची कर्तव्ये**

**१. प्रंबधक**

वर्ग ३ व वर्ग ४ चे कर्मचां-यावर देखरेख करणे, तसेच संस्थेच्या प्रमुख

अधिका-याला प्रशासकीय कार्यात सहाय्य करणे.

२. **स्वीय सहाय्यक**

संस्थेच्या प्रमुख अधिका-याला सहाय्य करणे.

३. **लघुलेखक (उच्च श्रेणी )**

संगणक / टंकलेखन यंत्रावर इंग्रजीत साक्षीपुरावा घेणे. अपीलेट न्यायाधीशांनी दिलेल्या केसेसमध्ये श्रृतलेखन घेवुन ते टंकलिखीत करणे.

४. **लघुलेखक (निम्म श्रेणी )**

संगणक / टंकलेखन यंत्रावर इंग्रजीत साक्षपुरावा घेणे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मुख्य न्यायदंडाधिकारी व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांनी दिलेल्या केसेसमध्ये श्रृतलेखन घेवुन ते टंकलिखीत करणे.

५. **अधिक्षक.**

त्यांच्या शाखेतील कर्मचा-यावर देखरेख ठेवणे जसे न्यायीक शाखा, वित्त शाखा, निरीक्षण शाखा आणि प्रशासकिय शाखा व सहाय्यक अधिक्षक न्यायालयाच्या अधिका-यांनी दिलेले कोणतेही काम करणे.

६. **सहाय्यक अधिक्षक** .

सहाय्यक अधिक्षकाचे कार्य तालुका स्तरावरील कर्मचा-यांवर देखरेख ठेवणे त्यांना सोपविण्यात आलेले कार्य व दररोज न्यायालयासमोर येण्या-या खटल्यासंबंधीत कार्य करून तेथील मुख्य न्यायीक अधिका-याला प्रशासकिय कार्यात मदत करणे.

ज्या ठीकाणी अधिक्षकाचे पद नाही अश्या ठीकाणी वित्त तसेच कॉपींग संबधीत कार्य करावे लागते तसेच न्यायीक अधिका-याने सांगीतलेले कुठलेही काम करणे.

७. <u>वरिष्ठ लिपीक</u>

जिल्हा न्यायालय व सबंधित न्यायालयातील वरिष्ठ लिपीक, सिरस्तेदार, मुद्देमाल सांखीकिय पत्रव्यवहार, लेखा व वित्त संबधीत कार्य करणे. तसेच न्यायीक अधिका-याने सांगीतलेले कुठलेही काम करणे.

८. <u>दुभाषी</u>

दुभाषी यांना मराठी भाषेतुन बयाण घेणे तसेच मराठीचे इंग्रजीमध्ये व इंग्रजीचे मराठी भाषांतर करावयाचे काम करावे लागते.

९. <u>कनिष्ठ लिपीक.</u>

न्यायालयातील केसेसचा ताबा व त्यांची देखरेख तसेच नेमुन दिलेले काम आणि न्यायीक अधिकारी व संस्थाप्रमुखाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे.

१०. <u>हेड बेलीफ</u>

आपल्या अधिपत्याखाली असलेल्या इतर बेलीफांवर देखरेख ठेवुन सबंधीत वित्तीय व्यवहार करणे व न्यायीक अधिका-याने दिलेले कुठलेही काम पार पाडणे.

११. <u>बेलीफ</u>

न्यायालयीन समन्स, वारंट तसेच नोटीसेस ची नियमानुसार तामीली करून न्यायीक अधिका-याने सांगितलेले कुठलेही काम करणे.

<u>वर्ग - ४</u>

<u>बुक बाईडंर</u>

वेगवेगळे परिपत्रक, कायदयांची पुस्तके, रजिस्टर/चोपडया यांची व्यवस्थित

शिलाई करून न्यायीक अधिका-याने सांगितलेले इतर काम करणे.

**उद्‌वाहक**

जिल्हा न्यायालयात असलेल्या उद्‌वाहकाची देखरेख व त्याचा नीट सांभाळ, व वापर करणे.

**झेरॉक्स ऑपरेटर**

जिल्हा न्यायालयातील कार्यालयीन कागदपत्रांची तसेच न्यायालयातील निकालांच्या/आदेशांच्या पक्षकारांच्या मागणीनुसार सत्यप्रती काढुन देणे आणि न्यायीक अधिका-याने सांगितलेले इतर काम करून आदेशाचे पालन करणे.

**वॉचमन/सुरक्षारक्षक**

न्यायालयीन परिसराची व इमारतीची सुरक्षा करणे तसेच न्यायीक अधिका-याने सांगितलेले इतर काम करणे.

**सफाईगार**

न्यायालयीन परिसरातील व इमारतीमधील प्रसाधन गृहांची स्वच्छता तसेच देखरेख व न्यायीक अधिका-याने सांगितलेले इतर काम करणे.

**पाणीवाला/वॉटरमन**

न्यायीक अधिकारी तसेच कर्मचारी वर्गाकरीता पाण्याचा पुरवठा करणे व न्यायीक अधिका-यानी सांगितलेले कामे करणे.

३. **वेगवेगळया स्तरावरील परिवेक्षन,जबाबदारी सहीत निर्णय घेण्याची कार्यपध्दती**

माननिय उच्च न्यायालय तसेच शासनाचे विधी व न्याय विभाग यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे अधिका-यांनी मार्गदर्शक तत्वाचे पालन करावे.

विभाग प्रमुख तसेच वरिष्ठ अधिका-यानी दिलेल्या निर्देशाचे न्यायालयात तसेच इतर विभागात काम करणा-या कर्मचा-यांनी पालन करावे.

प्रमुख जिल्हा व सत्र् न्यायाधीश, नागपूर हे संपूर्ण यंत्रणेवर लक्ष ठेवनु हाताखालील अधिका-याकडुन कामे करवुन घेतात त्याचप्रमाणे शासनाकडुन आलेल्या निधीचे त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या विभागाकडुन योग्य प्रकारे उपयोग अथवा विल्हेवाट करण्याकरीता वाटप करतात.

प्रमूख जिल्हा न्यायाधिशांच्या अधिपत्याखाली काम करणारे अधिकारी हे निरनिराळयाप्रकारचे स्टेटमेंट तसेच उपयुक्त माहीती आपल्या विभागप्रमुखांना पुढील कार्यवाहीकरिता माननिय उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी मागितल्याप्रमाणे सादर करतात.

नागपूर न्यायालयात दाखल करण्यात येणारे दिवाणी स्वरूपाचे दावे हे सुरवातीला दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर यांच्या न्यायालयात सादर करण्यात येतात. तसेच तालुका स्तरावर ते दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर यांचे कडे दाखल केले जातात व त्यांचे पंजीकरण व मुल्यांकन झाल्यावर ते दावे इतर न्यायाधीशांकडे कमवारीने व विशेष कार्यक्षेत्रान्वये पाठविले जातात.

दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, यांचे कडे रूपये ५,००,०००/-पर्यंत रकमेचे दावे चालविण्याचे अधिकार असतात तर दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर, यांना रूपये ५,००,०००/-वरची प्रकरणे चालविण्याचा अधिकार असतो तसेच हिंदु विवाह कायदा हया सारखे विशेष कायदयाअंतर्गत प्रकरणे चालविल्या जातात.

फौजदारी प्रकरणांसाठी मुख्य न्यायदंडाधिकारी हे जिल्हयाच्या ठीकाणी प्रमुख न्यायीक अधिकारी असतात. फौजदारी प्रकरणे ही फौजदारी न्यायालयात दाखल केली जातात.

फौजदारी स्वरूपाचे दावे हे प्रथम पोलीसठाणे अधिकारी व खासगी व्यक्ति मुख्य न्याय दंडाधिकारी, नागपूर यांच्या न्यायालयात तसेच इतर ठीकाणी व तालुक्यात हे दावे प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात पोलीस ठाण्यानुसार दाखल केले जातात. सदर दाव्यांचे पंजीकरण झाल्यानंतर ते दावे

न्यायीक दंडाधिका-यानां त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार भारतीय दंड विधानाचे कलम ४०९ अंतर्गत येणारी प्रकरणे सोडून निपटा-याकरीता वाटप केले जातात. शासकिय पैश्याबाबतच्या कलम ४०९ भा. द. वि. च्या केसेस फक्त मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात वर्ग करण्यात येताात.

कनिष्ठ न्यायालयात दिवाणी व फौजदारी मामल्यात निर्णय झाल्यानंतर त्यावरचे अपील जिल्हा न्यायालयात दाखल करण्यांत येते. तसेच सत्र न्यायालयात चालविण्यात येणारी प्रकरणे कनिष्ठ न्यायालयात दाखल केली जातात, त्यानंतर जिल्हा न्यायालयाकडे सुनावणीसाठी सुपूर्द केली जातात. मोटार अपघात तसेच विशेष कायद्याअंतर्गत जसे लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, महाराष्ट्र विद्युत मंडळ, अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच निवडणुक याचीका जिल्हा विशेष न्यायालयात दाखल करण्यात येतात.

किरकोळ गुन्हयात कबुली जबाब आणि मृत्युपुर्व जबानी घेण्याचे काम करण्याकरिता माननिय उच्च न्यायालयाव्दारे विशेष न्यायदंडाधिका-यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालय यांच्या निर्देशनानुसार १० सकाळचे आणि १२ सायंकालीन न्यायालये स्थापन करण्यात आले आहे. त्या न्यायधिशां कडे खालील फौजदारी प्रकरणे चालविण्याचे अधिकार दिले आहे.

१. तकारी कलम १३८ परकाम्य अधिनियम कायदा १८८१नुसार.

२. फौजदारी प्रकरणे जी संक्षीप्त स्वरूपातील, फौजदारी प्रक्रियासंहिता १९७३ च्या चाप्टर २१ अनुसार चालविली जातात.

३. दोन्ही पक्षकारांच्या संमतीने सायंकालीन न्यायालयात पाठविलेली प्रकरणे.

सकाळचे न्यायालय हे ८.३० ते १०.३० पर्यंत तर सांयकालीन न्यायालये ही ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत कार्यरत असतात.

माननिय उच्च न्यायालययाच्या निर्देशनानुसार कलम १३८ अन्वये परकाम्य अधिनियम १८८१ अंतर्गतप्रकरणांचा निपटारा करण्याकरिता खालीलप्रमाणे न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.

१. ८वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नागपूर.

२. १४वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नागपूर.

३. १८ वेसह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नागपूर.

४. २३ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नागपूर.

५. २४ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नागपूर.

६. २५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नागपूर.

मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विद्यापीठ कायदया अंर्तगत येणा-या प्रकरणांचा निपटारा करण्याकरीता २ रे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांच्या न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे.

**<u>कर्तव्य पालन करण्याकरिता दिलेली मार्गदर्शक तत्वे :</u>**

माननिय उच्च न्यायालय व शासनाव्दारे देण्यात येणा-या मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र नागरी सेवा नियम, महाराष्ट्र बजेट मॅन्युअल, मुंबई वित्तीय नियम, महाराष्ट्र कोषागार मॅन्युअल,रेग्युलेशन, महाराष्ट्र आकस्मीक खर्च नियम, शासकिय ठराव, शासकिय परिपत्रके, सुचनापत्रानुसार कार्य करीत असते.

**<u>५. निरनिराळे नियम, मार्गदर्शक तत्वे व मॅन्युअल अनुसार कर्मचा-यांनी कर्तव्य करीत असतांना उपयोगात येणारे नियम :</u>**

खालील उल्लेखित नियम, मार्गदर्शक तत्वे कर्मचा-यांनी कर्तव्य करीत असतांना उपयोगात आणली जातात.

१. महाराष्ट्र सिव्हिल मॅन्युअल-१९८६,

२. द क्रिमीनल मॅन्युअल-१९८०,

३. द कोड ऑफ सिव्हिल प्रोसिजर-१९०८,

४. द कोड ऑफ क्रिमीनल प्रोसिजर-१९७३,

५. महाराष्ट्र नागरी सेवा नियम,

६. द महाराष्ट् बजेट मॅन्युअल,

७. मुंबई वित्तिय नियम,

८. महाराष्ट् कोषागार नियम,

९. महाराष्ट् आकस्मिक खर्च नियम,

१०. सामान्य भविष्य निर्वाह निधी नियम,

११. स्टेशनरी ॲण्ड प्रींटींग मॅनुअल,

१२. द बॉम्बे कोर्ट फी ॲक्ट-१९५९,

१३. द बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट-१९५८,

१४. द लिमीटेशन ॲक्ट-१९६३,

१५. मॅनुअल ऑफ डिपार्टमेंटल इन्क्वायरीज्,

१६. महाराष्ट् शासनाव्दारे काढण्यात आलेले निरनिराळे ठराव परिपत्रक, राजपत्रक व त्याचबरोबर माननिय सर्वोच्च न्यायालयाव्दारे वेळोवेळी प्रसारीत काढण्यात आलेले ठराव, परिपत्रक व सुचनापत्रक.

६. <u>न्यायालयीन अधिपत्याखाली ठेवण्यात येणारे दस्तऐवजांचे प्रकार</u>

**कार्यालयातर्फे खालील प्रकारचे रजिष्टर, फाईल्स ठेवण्यात येतात.**

१. दिवाणी दावे दाखल रजिष्टर,

२. त्याचबरोबर खालील बाबींकरीता वेगवेगळे रजिष्टर ठेवण्यात येतात. स्पेशल सिव्हिल सुट रजिष्टर, रेगुलर सिव्हिल सुट रजिष्टर,स्मॉल काज सुट रजिष्टर, रेग्युलर दरखास्त रजिष्टर, स्पेशल दरखास्त रजिष्टर, कोर्ट फी रजिष्टर, स्टॅम्प डयुटी पेनाल्टी रजिष्टर, रिफंड कोर्ट फी रजिष्टर, रिट रजिष्टर-अे, बी, सी, व डी, जे वेगवेगळया प्रकारच्या केसेसची नोंदणी व विल्हेवाट इत्यादीच्या नोंदी, दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर नागपूर व तालुका न्यायालयात दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,यांच्या न्यायालयात वरील सर्व रजिष्टर्स ठेवण्यात येतात.

३. फौजदारी मुख्य न्यायदंडाधिकारी आणि प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात वेगवेगळे रजिष्टर ठेवण्यात येतात.त्यामध्ये रेग्युलर आय.पी.सी, रेग्युलर इतर केसेस, समरी आय.पी.सी केसेस व इतर समरी केसेस किरकोळ फौजदारी केसेस इत्यादी.

४. रेग्युलर सिव्हील अपील व किरकोळ सिव्हील अपील केसेस चे वेगवेगळया रजिष्टरात नोंद घेवुन ते जिल्हा व सत्र् न्यायालयात पाठविण्यात येतात.तसेच केसचा निकाल लागल्यानंतर निकालांच्या नोंदीपण रजिष्टरमध्ये घेण्यात येतात तसेच मोटार अपधात दावे हे सदस्य मोटार अपधात दावा न्यायाधिकरण यांचे न्यायालयात रजिष्टर नोंदणी करून ते क्रमवारीने न्यायानिवाडयाकरीता पाठविण्यात येतात. तसेच निकाल लागलेल्या दाव्यांच्या नोंदी रजिष्टरमध्ये घेण्यात येतात.

५. सेशन ट्रायल केसेस नोंदणीकरीता न्यायीक विभागात वेगवेगळे रजिष्टर ठेवण्यात येतात. जसे : सेशन ट्रायल केसेस नोंदणी रजिष्टर स्पेशल केसेस नोंदणी रजिष्टर, क्रिमीनल अपील, क्रिमीनल रिव्हिजन व क्रिमीनल ॲप्लीकेशन.

६. दिवाणी व फौजदारी कोर्टामध्ये मॅन्युअल मध्ये दिलेल्या कार्यपध्दतीनुसार दैनंदीन तक्ता, मेमारंडम बुक, दैनदिन कोर्ट फी, रजिष्टर, रिट रजिष्टर इत्यादी प्रकारचे रजिष्टर ठेवण्यात येते.

७. न्यायालयीन जमाखर्चाचा हिशोब ठेवण्याकरीता खालील प्रकारचे नोंदणी रजिष्टर ठेवण्यात येतात.
कोर्टास प्राप्त झालेल्या रकमेचे पावतीपुस्तक,
सी रजिष्टर-अनामत जमा रकमेची नोंदणी.

डी रजिष्टर-अनामत प्रदानाची नोंदणी.

रजिष्टर-दिवाणी दाव्यामध्ये दाखल केलेल्या व जोडलेल्या

संपत्तीचे रजिष्टर,

एफ रजिष्टर-उपजिवीकेसाठी प्राप्त झालेल्या रकमेचे रजिष्टर,

जी रजिष्टर-जमा भत्ता रजिष्टर,

एच रजिष्टर- भत्ता परतावा रजिष्टर

आय रजिष्टर- कॅश बुक, दैनदिन रोकड वही,

जे रजिष्टर- लेजरबुक,

के रजिष्टर-ट्रेझरी पास बुक,

एल रजिष्टर-ट्रेझरी चेक बुक

तसेच फौजदारी व दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये उल्लेख केल्यानुसार वेगवेगळे रजिष्टर ठेवण्यात येतात.

८. अभिलेख कोषागारात खालील प्रकारचे रजिष्टर ठेवण्यात येतात. दिवाणी व फौजदारी अर्जासाठी वेगवेगळे रजिष्टर असतात. तसेच सामान्य व तातडीचे अर्जासाठी वेगवेगळे रजिष्टर असतात, दैनंदिन फी पुस्तीका आणि दैनंदिन फी हिशोब रजिष्टर असतात.

९. अभिलेख कोषागारात नागपुर जिल्हयातील सर्व न्यायालयात निर्णय लागलेल्या प्रकरणांचे रेकॉर्ड यादीनुसार अभिलेखागारात जमा करण्यात येतात आणि त्यांच्या सत्यप्रतीचे अर्ज असल्यास सत्यप्रती तयार करून सहायक अधिक्षक अभिलेखागारांच्या मार्फत देण्यात येतात.

७. लोकप्रतिनिधीव्दारे धोरण तयार करणे व ते अंमलांत आणणे हयाची काही व्यवस्था आहे काय, 'निरंक'

८. उपलब्ध असलेल्या समित्या लोंकाकरीता खुल्या आहेत काय किंवा दोन किंवा दोनपेक्षा जास्त लोंकाव्दारे सल्ला देण्याकरीता तयार करण्यात आलेली समिती, त्या समितीची मिटींग व त्याचा वृतांत लोकांकरीता उपलब्ध आहे काय

निरंक'

अधिका-याची माहीती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

नागपूर जिल्हयात कार्यरत असणा-या अधिका-यांची यादी :-

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी.डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| श्री. एस. डी. मोहोड, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | २५३१९८९ | २५३२०३५ | ..... |
| श्री. ए. सी. बच्छाव, जिल्हा न्यायाधीश - १ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | २५३१९८९ | ..... | ९८६७८५९३३३ |
| श्री. जी. जे. अकर्ते, जिल्हा न्यायाधीश - २ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | २५३१९८९ | २५५२३२९ | ९४२२८२५२१० |
| सौ. पी. व्ही. गणेडीवाला जिल्हा न्यायाधीश - ३ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५४१८८६ | ९४०३९३०४९४ |

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी. डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| श्री. जी. टी. काद्री जिल्हा न्यायाधीश - ४ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५४९८९० | ९९८७२६३८७४ |
| श्रीमती व्ही. एन. ताम्बी जिल्हा न्यायाधीश - ५ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | .... | ९९२२६२४५१५ |
| श्री. एस. जी. मेहरे जिल्हा न्यायाधीश - ६ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५२९९९३ | ९४२२१६३५४२ |
| श्री. एम. डब्लू. चांदवानी जिल्हा न्यायाधीश - ७ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५५४०२१ | ९२२५२१९४४२ |
| श्रीमती व्ही. पी. इंगळे जिल्हा न्यायाधीश - ८व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५४३५३६ | ९९२३३३८७५५ |
| श्री. एस. सी. चांडक जिल्हा न्यायाधीश - ९ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५२०३११ | ९६९९२७५२३१ |
| श्री. एस. डी. जगमलानी जिल्हा न्यायाधीश - १० व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५४००९५ | ८२७५४०१३४० |
| श्री. व्ही. पी. पाटकर जिल्हा न्यायाधीश - ११ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५२०२५० | ९९६९९२८१२६ |

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी.डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| श्री. पी. एम. दुनेदार<br>जिल्हा न्यायाधीश - १२<br>व अति. सत्र न्यायाधीश,<br>नागपूर | ०७१२ | ...... | २५६९९५९ | ९४२२९६६५१० |
| श्री. एस. आय. पठान<br>जिल्हा न्यायाधीश - १३<br>व अति. सत्र न्यायाधीश,<br>नागपूर | ०७१२ | ..... | २५६९९८९ | ९४२२६५१६०० |
| सौ. पी. एन. नायर<br>जिल्हा न्यायाधीश - १४<br>व सहा. सत्र न्यायाधीश,<br>नागपूर | ०७१२ | ..... | ९२२६१६८७६४ | ९०२११३१३६७ |
| श्री. व्ही. एस. मुरकुटे<br>जिल्हा न्यायाधीश - १५<br>व अति. सत्र न्यायाधीश,<br>नागपूर | ०७१२ | ..... | २२२०७३७ | ९४२२८३५८५० |
| श्री. ए. आर. धामेचा<br>जिल्हा न्यायाधीश - १६<br>व अति. सत्र न्यायाधीश,<br>नागपूर | ०७१२ | ..... | २५५४४०९ | ०९४२२७७९७६२ |
| श्री. बी. एस. चव्हाण<br>जिल्हा न्यायाधीश - १७<br>व सहा. सत्र न्यायाधीश,<br>नागपूर | ०७१२ | ..... | २२५६९९९६ | ९५६१४४९०२२ |
| श्री. व्ही. डी. शुक्ला<br>सदस्य एम. ए. सी. टी.<br>नागपूर | ०७१२ | २०४२९२१ | २५४५२१७ | ९८२३५६६५७८४ |
| रिक्त<br>सदस्य एम. ए. सी. टी.<br>नागपूर | ०७१२ | ....... | ...... | ........ |
| श्री. के. डी. वदने<br>सदस्य एम. ए. सी. टी.<br>नागपूर | ०७१२ | ..... | २५६६८३७ | ९४२२६५७६८३ |
| श्री. व्ही. एन. चव्हाण<br>सदस्य एम. ए. सी. टी.<br>नागपूर | ०७१२ | .... | ..... | ९०११५१५४९१ |

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी. डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| श्री. के. एल. व्यास<br>तदर्थ जिल्हा न्यायाधीश - १ व अति. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | ..... | ०९८६९६३३९९९ |
| श्री. पी. आर. रघुंवशी<br>तदर्थ जिल्हा न्यायाधीश - २ व सहा. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | ...... | ९९७०९३२४४३ |
| श्री. आर. पी. पांडे<br>तदर्थ जिल्हा न्यायाधीश - ३ व सहा. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | २५२९८८० | ९४२३६२८६८३ |
| रिक्त<br>तदर्थ जिल्हा न्यायाधीश - ४ व सहा. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | .... | ..... |
| श्री. एस. पी. डोरले<br>तदर्थ जिल्हा न्यायाधीश - ५ व सहा. सत्र न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५५०१२० | ९८२२९७३७६६ |
| श्री. व्ही. एस. पडाळकर<br>लघुवाद न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | २५५२११८ | २५५०९५६ | ९४२२०१३५५२ |
| श्री. ए. ए. नांदगावकर<br>अति. लघुवाद न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५४५२१४ | ९४२२८८४०२५ |
| श्री. के. एम. जयस्वाल<br>सचिव, जिल्हा विधी प्राधिकरण,<br>नागपूर | ०७१२ | २५४१०६२ | २२४६१९१ | ९९६९४९००६० |
| श्री. डब्लू. व्ही. गुघाने<br>दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर<br>नागपूर | ०७१२ | .... | २५२०५७१ | ९८९२२५००६५ |

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी.डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| कु. आर. एन. पंढारे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर | ०७१२ | .... | २५४९९४९ | ०८०८७२१७६३ |
| कु. ए. सी. राउत २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर स्तर तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर | ०७१२ | .... | २५५४९३६ | ९३२६८७८९७२ |
| श्री. व्ही. एम. पाथाडे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर स्तर तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर | ०७१२ | .... | २५६९९५८ | ९४०३९३०८३२ |
| श्री. एम. आर. नातु ४ थे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर स्तर तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर | ०७१२ | .... | २५४५५५२ | ९४२२८७९०७८ |
| कु. एस. टी. कटारे ५ वें सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर स्तर तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर | ०७१२ | .... | २५५९८०८ | ९४०३०८३८८० |
| श्री. ए. व्ही. कुळकर्णी ६ वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर स्तर तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर | ०७१२ | .... | .... | ९२२६९३७८४९ |
| श्री. एस. एम. आगरकर ७ वे सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर स्तर तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर | ०७१२ | .... | २५४१२९८ | ९४०३५९४९८७ |

| अधिका–यांची नावे पदासहीत | एस.टी.डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| श्रीमती पी. पी. कार्णीक मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर | ०७१२ | .... | २५८००७५ | ९०४९०८९८८६ |
| श्री. एस. ए. एस. एम. अली अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर | ०७१२ | .... | २५३४९४७ | ९७६५४९७१९८ |
| श्री. के. आर. पाटील २ रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर | ०७१२ | .... | २५२०५८० | ९४२२१४१३६१ |
| श्री. एम. एस. लोणे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | २५५००२३ | ९४२१७८९९१६ |
| श्री. ए. एम. भंडारवार २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | २५४५०१६ | ८०८७५७६७७५ |
| श्री. आर. डी. गाघवे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | २५५००९० | ९४२३४४६६७४ |
| श्री. बी. पी. व्यास ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | २५३०१२३ | ९४२०५३०७६४ |
| श्रीमती आर. डी. खेडेकर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश न्यायालय क. ५, नागपूर | ०७१२ | .... | २५२०२७२ | ९४२३०१४७२ |

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी. डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| श्री. एम. एम. राव, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | २२३८९० | ९६२३७२७५०१ |
| श्रीमती ए. एच. काशीकर ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश न्यायालय क. १, नागपूर | ०७१२ | .... | २२४७७३९ | ९८२२२०२३५६ |
| श्री. एस. एम. काळे ८ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | .... | ९४२१६५५३९२ |
| कु. टी. एन. जाधव ९ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश न्यायालय क. २, नागपूर | ०७१२ | .... | २५५२६२५ | ९०४९७२०४५९ |
| श्री. सी. आर. बलवानी, १० वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश महानगरपालीका न्यायालय क. २, नागपूर | ०७१२ | .... | .... | ८९०८१६०७९ |
| श्री. डी. एस. खेडेकर ११ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश. नागपूर | ०७१२ | .... | २५२०२७२ | ९४२३५३३८८१ |

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी.डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| श्री. डी. आर. देशमुख १२ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश न्यायालय क. ३, नागपूर | ०७१२ | .... | २५२२५१० | ९४२२४०५३८२ |
| श्री. एन. एन. जोशी १३ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश न्यायालय क. ६, नागपूर | ०७१२ | .... | २५४९९४९ | ९४२१८३९००६ |
| श्री. के. एच. पाटील १४ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | २५२०१६९ | ९४२३५२०१०९ |
| कु. एन. के. पाटील १५ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश न्यायालय क. ८, नागपूर | ०७१२ | .... | २५५५०२० | ९८२२७०९१२४ |
| श्री. एस. एस. अरडवाड १६ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश न्यायालय क. ९, नागपूर | ०७१२ | .... | ...... | ९४२३२१८५६४ |
| श्री. ए. एस. पडांगळे १७ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश न्यायालय क. १०, नागपूर | ०७१२ | .... | ..... | ९८६००७०५५८ |

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी. डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| श्री. व्ही. व्ही. कुळकर्णी १८ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | .... | ९८२२२९७३७० |
| कु.. ए. ए. जी. एम. शेख (कु. जी.एस.एम.अल अमोडी) १९ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश न्यायालय क. ७, नागपूर | ०७१२ | .... | ..... | ९४२०९११५५६ |
| श्री. एम. ए. एम. हुसेन २० वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश महानगर पालीका न्यायालय क. १, नागपूर | ०७१२ | .... | ..... | ९०९६४०१३९९ |
| श्री. एच. ए. एच. आय. हाशमी २१ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश,नागपूर | ०७१२ | .... | ...... | ९९७०६५७९५६ |
| श्री. ए. ए. वलुजकर २२ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश न्यायालय क. ४, नागपूर | ०७१२ | .... | ...... | ९८२२४४४५५८ |
| श्री. एन. एस. काकडे २३ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | ...... | ९८५००८८३५५ |

| अधिका–यांची नावे पदासहीत | एस.टी.डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| श्री. एम. टी. ठवरे<br>२४ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | २५५१२५४ | ९८९०२२५४५१ |
| श्री. एन. एच. तिखे<br>२५ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | .... | ...... | ९९७०६२११३२ |
| श्री. व्ही. ए. साठे<br>२६ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५४९९७४ | ९६६५८५०२९० |
| श्री. एन. डी. जाधव<br>२७ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५४००१५ | ९८२२१९१९२२ |
| श्री. एम. जे. मोहोड<br>२८ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | .... | ९७६४३२३९३२ |
| श्री. जी. डी. अग्रवाल<br>२९वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५२५१५५ | ९०२८८९११९९ |
| श्री. आर. वाय. खंडारे<br>३० वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५३००९७ | ९८६०४७०७१० |

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी.डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| कु. एम. वाय. नेमाडे ३१ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | २५४९८५९ | ८६००६१०३०६ |
| श्री. एस. जी. चिमनकर अति. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | .... | ८४४६२३५२३६ |
| कु. जे. डी. होशंगाबादे अति. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | ...... | ९४२२९३८६१५ |
| श्री. एस. टी. एस. एच. ए. जे. अति. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | ..... | ...... |
| श्री. बी. एम. काळे अति. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | ....... | ..... |
| श्री. एस. पी. बेदलकर अति. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | ...... | ...... |
| श्री. ए. व्ही. ढोरे अति. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | ०७१२ | ..... | ..... | ..... |
| कु. आर. आर. चौधरी अति. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा | ०७१२ | ..... | ...... | ...... |

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी.डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश, नागपूर | | | | |
| श्री. एन. एच. जाधव न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश (मोटार वाहन न्यायालय ) नागपूर | ०७१२ | ..... | २५५२६२५ | ९०४९७२०४५८ |
| श्री. एम. एन. पटांगळे न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश (लोहमार्ग न्यायालय) नागपूर | ०७१२ | ..... | ...... | ९८६०४८०३०४ |

## तालुका स्तरावरील कोर्ट

| अधिका-यांची नावे पदासहीत | एस.टी. डी. नंबर | कार्यालयीन दुरध्वनी | निवासस्थान नंबर | भ्रमणध्वणी नंबर |
|---|---|---|---|---|
| श्री. एस. टी. अग्रवाल दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश काटोल | ०७११२ | २२२१६६ | २२३४९९ | ९४२३१४६७१५ |
| श्री. एस. डी. भगत सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश काटोल | ०७११२ | २२२१६६ | २२०२०७० | ९८२२४९०४३४ |
| श्री. ए. ए. आयचीत दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश सावनेर | ०७११३ | २३२४५७ | २३२३३८ | ९८५०३३९८०२ |
| श्री. सी. एल. देशपांडे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश सावनेर | ०७११३ | २३२४५७ | २३२१९२ | ९४२१७५५४८२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. पी. एस. चांदगुडे दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश रामटेक | ०७११४ | २५५२०२ | २५५०२२ | ९८२३७०३२१५ |
| श्री. एस. एन. साळवे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश रामटेक | ०७११४ | २५५२०२ | ..... | ९९७५४४९९२४ |
| श्री. एस. एस. पल्लोड दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश उमरेड | ०७११६ | २४२२०८ | २४२२०८ | ..... |
| श्री. एन. ए. सरोसीया सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश उमरेड | ०७११६ | २४२२०८ | २४४२२४ | ९९२३०५७७८८ |
| कु. टी.के. मोहम्मद दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश कामठी | ०७१०९ | २८७४०४ | २८६१४७ | ९८२२५५१८२९ |
| श्री. वाय. बी. गमे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश कामठी | ०७१०९ | २८७४०४ | २८२९३५ | ९४२२७५७७०१ |
| श्री. ए. के. अवारी दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश नरखेड | ०७१०५ | २३२२०० | २३२९४५ | ८९२२९३५४७६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. एम. पी. भवसार<br>दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा<br>न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश कुही | ०७१०० | २२२६५५ | ..... | ९४२२७८६१४९ |
| श्री. ए. ए. घुमकेकर<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा<br>न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश कुही | ०७१०० | २२२६५५ | ... | ९८५०७८२३१५ |
| श्री. वाय. आय. भंडारी<br>दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा<br>न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश कळमेश्वर | ०७११८ | २७१११७ | २७१०५७ | ९४२२७४३८१२ |
| श्री. डी. एन. खेर<br>दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा<br>न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश मौदा | ०७११५ | २८१०७५ | २८१०८७ | ९४२२०४५७५३ |
| श्री. डी. एस. कोलते<br>दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा<br>न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश हिंगणा | ०७१०४ | २७६४२६ | २८००२९ | ९८२२७३१५३८ |
| श्री. एन. के. करंडे<br>दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा<br>न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश भिवापूर | ०७१०६ | २३२०३२ | २३२०७२ | ९८९०९५००७१ |
| श्री. ए. व्ही. मिश्रा<br>दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा<br>न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. न्यायाधीश पारशिवनी | ०७१०२ | २२५५२२ | २२२५१४२ | ९७६६३६१८६२ |

<u>न्यायीक अधिका-यांना आणि कर्मचा-यांना मिळणारे मासीक वेतन</u>

माहीती खालील प्रमाणे आहे.

<u>वर्ग-१</u>

१. प्रमुख जिल्हा व सत्र् न्यायाधीश,

रूपये ५७७००-१२३०-५८९३०-१३८०-६७२१०.१५४०-७०२९०.

२. जिल्हा व अतिरिक्त सत्र् न्यायाधीश/तदर्थ जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

रूपये ५१५५०-१२३०-५८९३०-१३८०-६३०७०

३. दिवाणी न्यायाधीश व.स्तर/ मुख्य न्यायदंडाधिकारी/न्यायाधीश लघुवाद न्यायालय,

रूपये ३९५३०-९२०-४०४५०-१०८०-४९०९०-१२३०-५४०१०

४. दिवाणी न्यायाधीश क.स्तर/ प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी,

रूपये २७७००-७७०-३३०९०-९२०-४०४५०-१०८०-४४७७०

<u>वर्ग-२.</u>

५. प्रबंधक, रूपये (९३००-३४८००)+ ४४००

६. स्वीय सहा्यक, रूपये (९३००-३४८००)+ ४६००

<u>वर्ग-३</u>

७. अधिक्षक, रूपये (९३००-३४८००)+ ४३००

८. सहाययक अधिक्षक, रूपये (९३००-३४८००)+ ४२००

९. लघुलेखक उच्च श्रेणी, रूपये (९३००-३४८००)+ ४४००

१०. लघुलेखक निम्म श्रेणी, रूपये (९३००-३४८००)+ ४३००

११. दुभाषी, रूपये (५२००-२०२००)+ २८००

१२. वरीष्ठ लिपीक,रूपये (५२००-२०२००)+ २४००

१३. कनिष्ठ लिपीक रूपये (५२००-२०२००)+ १९००

१४. प्रमुख बेलीफ, रूपये (५२००-२०२००)+ २०००

१५. बेलीफ,रूपये (५२००-२०२००)+ २०००

१६. वाहक, रूपये (५२००-२०२००)+ २०००

**वर्ग-४**

१७. उद्वाहक, रूपये (५२००-२०२००)+ १६००

१८. पुस्तक बांधणीकार, रूपये (५२००-२०२००)+ १९००

१९. हवालदार,रूपये (५२००-२०२००)+ १६००

२०. नायक / झेरॉक्स आपरेटर, रूपये (५२००-२०२००)+ १६००

२१. शिपाई / सुरक्षा रक्षक / सफाईगार, रूपये (४४४०-७४४०)+१३००

२२. पाणिवाला, रूपये (४४४०-७४४०)+ १३००

**११. प्रत्येक न्यायीक विभागाला प्राप्त होणारे अनुदान व नविन योजनांचा उल्लेख तसेच लागणारा खर्च आणि वाटपाचा अहवाल**

प्रत्यक्षात न्यायीक विभागाला शासनातर्फे वेगवेगळया शिर्षाखाली अनुदान प्राप्त होते व ते वेगवेगळया विभागाला त्यांच्या मागणीनुसार योग्य बाबीवर खर्च करण्याकरिता वाटप करण्यात येते.

१२. **आर्थिक मदत करण्याचे कार्यक्रम अंमलात आणने उपलब्ध निधि आणि या कार्यक्रमाव्दारे फायदा घेणा-यांची माहीती :** -' निरंक'

१३. **सवलत, परवाना इत्यादी बाबत तपशिल :**

प्रमुख जिल्हा व सत्र् न्यायाधीश हे न्यायालयातील वकिलांचे काम करणा-या कारकुनांचा त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वकीलांचे कारकुन म्हणून परवाने देतात. तसेच न्यायालयातील कामकाजाचा आढावा घेवुन अर्जनविसांना आवश्यकतेनुसार परवाना देण्यात येतो.

१४. **कार्यालयीत संगणीकरण झालेल्या माहीतीचा तपशील :**

जिल्हा न्यायालयामध्ये संगणीकरण झालेले असुन त्यामध्ये दिवाणी तथा फौजदारी व इतर प्रलंबित असलेल्या आणि निकाली निघालेल्या प्रकरणासंबंधी

सर्व माहीती संगणकावर उपलब्ध असुन माहीती नियमीतपणे सुधारीत केली जाते. तसेच दैनदिन कार्यालयीन कामकाज संगणकावरच केले जाते..

१५. **इतर नागरिकांसाठी ग्रंथालय किंवा वाचनालय असेल तर ग्रंथालयाचे कामाचे तास तसेच माहीती मिळविण्याकरिता असलेल्या सोयीचा तपशिल :**

प्रत्येक कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रंथालय सुरू राहते परंतु ही सोय नागरिकांसाठी उपलब्ध नाही.

जर एखादयाला माहीतीच्या अधिकारात माहीती पाहीजे असेल तर तो अर्जासोबत रूपये १०/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावून जन माहीती अधिका-याकडे माहीती प्राप्त करण्याकरीता अर्ज करू शकतो.

**माहीती प्राप्त करण्याकरीता आवश्यक असलेली फी :**

| अनुक्रमणिका | दसताऐवजाचा तपशिल | फी |
|---|---|---|
| १ | पहिले अपिलाची जंत्री. | रू. २० /- कोर्ट फी स्टॅम्प. |
| २ | केसेसचे निरिक्षण करणे | पहिल्या तासाकरीता निशुल्क व पुढील प्रत्येक तासाकरीता ५ रूपये. |
| ३ | सत्य प्रतिव्दारे माहिती देण | रुपये २ /.प्रती पेज |
| ४ | टाईपकेलेली माहिती देणे | रुपये ५ /-प्रती पेज |
| ५ | संगणकावरुन प्रिंट काढून देणे | रुपये ५/- रु-प्रती पेज |

१६ <u>**माहीती अधिका-याचे नाव, पद आणि इतर तपशील**</u>

उच्च न्यायालयाकडुन प्राप्त झालेल्या सुचने नुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशानी एक जनमाहिती अधिकारी नियुक्त केलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

नाव :- श्री. मोहम्मद नियाज

पद :-प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर

कार्यक्षेत्र :- जिल्हा न्यायालय, नागपूर

पत्ता :- जिल्हा न्यायालय, सिव्हिल लाईन, नागपूर.

फोन नं.:- ०७१२ - २५३१९८९ मोबाईल नं.९४२३४०७७३२

<u>**अपिलीय अधिकारी**</u> :-

नाव :- श्री.जी. जे. अकर्ते

पद :- प्रभारी जिल्हा न्यायाधीश -१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

कार्यक्षेत्र :- जिल्हा न्यायालय, नागपूर,

पत्ता :- जिल्हा न्यायालय, सिव्हिल लाईन, नागपूर.

फोन नं.:- ०७१२ - २५३१९८९

१७. इतर माहिती :-

कोर्टातील कर्मचा-यांच्या आवश्यक बाबींची पूर्तता करण्याकरीता नागपूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी सहकारी पत संस्था, स्थापन केली आहे.

(एस. डी. मोहोड)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
नागपूर